# पिंपरी येथील मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
# सो. यांचे कोर्टात

पी.डब्ल्यू डी. अर्ज क्र.२२८/२०२४

सौ. वैष्णवी किरण मोरे —— अर्जदार

विरूद्ध

श्री. किरण सुरेश मोरे —— सामनेवाला

अर्जः एकतर्फी आदेश रद्द करणेकामी

सदरकामी सामनेवाला तर्फे विनंती अर्ज की,

१. प्रस्तुत अर्ज मे. कोर्टासमोर अंतरित पोटगी करता नेमण्यात आलेला आहे.

Order

O.S to say

Sd/- 29/1/2025

२. प्रस्तुत अर्जात सामनेवाला यांना समन्स मिळल्यानंतर सामनेवाला हे मे. कोर्टात हजर होवून त्यांच्या वतीने ॲडव्होकेट नेमलेले होते.

३. प्रस्तुत अर्जात सामनेवाला मे. कोर्टात हजर झाल्यानंतर सामनेवाला यांना त्यांच्या वकीलाकडून सदरील प्रकरणाची आवश्यक माहिती मिळालेली नाही. व तद्नंतर सामनेवाला

यांनी त्यांच्या वकीलांसी वारंवार संपर्क व फोन केला असता त्यांचा संपर्क झाला नाही. त्यामुळे मे. कोर्टाने सामनेवाला यांच्या विरूद्ध एकतर्फी हुकूम दि. १७/०९/२०२५ रोजी पारीत केलेला आहे.

४. तद्नंतर सामनेवाला यांनी ॲड. वर्षा गागरे यांच्याशी संपर्क साधून त्यांच्या मार्फत नवीन वकीलपत्र दि. ०४/१२/२०२५ रोजी मे. कोर्टात दाखल केलेले आहे.

५. प्रस्तुत अर्जातील सामनेवाला हे सरकारी कर्मचारी असून त्यांना त्यांचे वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे वारंवार बाहेरच्या ठिकाणी डयुटी निमित्त जावे लागते. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात त्यांचे वकीलांना सामनेवाला वेळेत व आवश्यक माहिती व कागदपत्रे देवू शकले नाहीत.

६. प्रस्तुत अर्जाचा न्याय निर्णय कामी सामनेवाला यांचे म्हणणे मे.कोर्टाच्या रेकॉर्डवर येणे आवश्यक व गरजेचे आहे.

७. प्रस्तुत अर्जाचा निकाल हा गुणदोषावर दावा चालवून लागणे आवश्यक आहे. त्यासाठी सामनेवाला यांना लेखी म्हणणे

दाखल करणे गरजेचे आहे. जर तसे झाले नाही तर खरी व सत्य परिस्थिती मे. कोर्टासमोर येणार नाही व सामनेवाला यांना न्याय मिळणार नाही.

८. प्रस्तुत अर्जात सामनेवाला यांनी त्यांचे म्हणणे दाखल केल्यास अर्जदाराचे कुठलेही नुकसान होणार नाही किंवा त्यांच्यावर अन्याय होणार नाही. याउलट म्हणणे दाखल न करून घेतल्यास सामनेवाला कधीही भरून न येणार असे आर्थिक नुकसान होणार आहे.

९. सदर म्हणेणे दाखल करण्यास झालेला उशिर हा सामनेवाला यांनी हेतूपुरस्सर केलेला नसून सामनेवाला हे कायदयाच्या दृष्टीने अज्ञान असून कोर्टाची प्रक्रिया त्यांना माहिती नसल्याने व वकीलांनी योग्य ते मार्गदर्शन न केल्याने राहून गेलेली आहे.

१०. **तरी मे. कोर्टास विनंती की,**

अ) सामनेवाला यांचे विरूद्ध दि. १७/०९/२०२५ रोजी पारीत केलेला एकतर्फी आदेश सेट असाईट करण्यात यावा.

ब) मे. कोर्टाने सामनेवाला यांना त्यांचे म्हणणे व इतर महत्वाची कागदपत्रे मे. कोर्टात दाखल करण्याची परवानगी मिळावी.

क) इतर योग्य ते न्यायाचे हुकूम व्हावेत.

~~पुणे~~ पिंपरी

दिनांक:— २९/१२/२०२५

सामनेवाला तर्फे ॲडव्होकेट

सामनेवाला

अर्जदारातर्फे म्हणणे,

(1) जाबदेणार यांचा सदरचा अर्ज व त्यामधील मजकूर खरा व बरोबर नसून सदरचे प्रकरण प्रलंबीत करणेच्या उद्देशाने जाबदेणार हे वेगवेगळे चुकीचे कारण नमूद केलेले आहे.

(2) अर्जदाराने सदरचा अर्ज दि-14-11-2024 रोजी दाखल केलेला असून जाबदेणार हे तेव्हापासून सदरच्या प्रकरणात हजर राहून मुदत घेत आहेत. मे. कोर्टाने वेळोवेळी जाबदेणारास संधी देऊन सुद्धा त्यांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही. अर्जदाराने नि-5 वर युक्तीवाद केल्यानंतर सदरच्या खोट्या आशयाचा अर्ज केलेला असून तो नामंजूर होणेस पात्र आहे. परंतु अर्जदारास सदरचे प्रकरण गुणदोषावर चालवयेचे असल्याने जाबदेणाराचा अर्ज मंजूर केल्यास जाबदेणारावर अर्जदाराचा व मे. कोर्टाचा वेळ घेतल्याने heavy cost करणे आवश्यक आहे. तरी सदरचा अर्ज खर्चासहित नामंजूर करणेत यावा.

24-12-2025